नि.फौ.ख.नं.४३/२०१७

**निशाणी क्र.४९**

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्र.४ यांची जबानी</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करते की,

**माझे नाव - हनुमंत पांडुरंग भोसले,**

वय - ४२ वर्षे, व्यवसाय – मजुरी

रा. बावडा, ता.इंदापूर, जि.पुणे.

**<u>सरतपास सरकारतर्फे सहा.सरकारी अभियोक्ता श्री.एस.एस.भांडारकर यांच्यामार्फत शपथेवर सुरु –</u>**

१. दि.१७/०८/२०१६ रोजी पोलिसांनी मला बोलावले नव्हते. माझ्यासमक्ष पंचनामा झाला नाही. मला आता पंचनामा दाखविला. त्यावर माझी सही आहे. सहीला **<u>निशाणी ५०</u>** देण्यात येते.

**(साक्षीदार अभियोग पक्षास सहाय्य करीत नसल्याने व पुर्वीच्या विधानापेक्षा फारकत करीत असलेली विधाने करीत असल्याने सहा.सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उत्तरसूचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली – परवानगी देण्यात आली.)**

२. हे खरे नाही की, दि.१७/०८/२०१६ रोजी पोलिसांनी माझ्यासमक्ष २ फुट ५ इंच लांबीची व १.५ इंच रुंदीची दोन पेरे असलेली कळकाची काठी पंचनाम्याने जप्त केली. हे खरे नाही की, त्यावेळी माझ्यासोबत दुसरे पंच जाफर रमजान मुलाणी उपस्थित होते. हे खरे नाही की, पंचनामा माझ्यासमक्ष तयार करण्यात आला व तो वाचून मी त्यावर सही केली. हे खरे नाही की, आरोपी माझ्या ओळखीचे असल्याने त्यांना वाचविण्याकरिता खोटी साक्ष देतो.

**सरतपास पुर्ण.**

**<u>आरोपींतर्फे विधिज्ञ श्री.एन.ए.मारकड यांनी उलटतपास नाकारला.</u>**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by PRAJKTA RAJEEV SABNIS
Date: 2025.10.17 18:05:28 +0530

**(प्राजक्ता राजीव सबनीस)**

**दि.१७/१०/२०२५**

**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, इंदापूर,**
**ता.इंदापूर, जि.पुणे.**